शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०२६१२२२१७
ई मेल आय.डी.क्र dydpune@gmail.com
वेब साईट क्रमांक www.dydepune.com

परिपत्रक

जा.क्र./शिउसं/उमाशि-४/पुवि/२०१३-१४ २१५७८/७
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे -१ यांचे कार्यालय
दिनांक : 6 SEP 2013

प्रति,
प्राचार्य
सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
पुणे/सोलापूर/अहमदनगर.

विषयः कनिष्ठ महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या जातीत/नावात/आडनावात/वडिलांच्या नावात बदल करणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार कनिष्ठ महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या जातीत/नावात/आडनावांत/ वडीलांच्या नावात बदल करणेबाबतचे प्रस्ताव सादर करताना खालीलप्रमाणे सूचनांचा अवलंब करावा.

१) प्रस्ताव सादर करताना परिपूर्ण पाठविण्यात यावा.

२) विहीत प्रपत्रातील सर्व रकाने भरलेले असावेत.

३) प्रपत्रात दिनांकासहित प्राचार्य यांनी स्वतःचे नांव नमूद करुन स्वाक्षरी करावी. करीता म्हणून सही केलेले प्रस्ताव नाकारण्यात येतील.

४) शाळा सोडलेल्या मुलांचे जात/नाव/आडनांव/वडीलांचे नांव अशा कोणत्याही प्रकारचे बदल करता येत नसल्यामुळे असे प्रस्ताव पाठविण्यात येऊ नये.

५) जातीचा मूळ दाखला या कार्यालयाकडे पाठवू नये. तथापि त्याची झेरॉक्स प्रत प्राचार्य यांनी साक्षांकित करुन पाठवावी.

६) शक्यतो विद्यार्थी इयत्ता ११ वी मध्ये आल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांचे नांव, पूर्ण नांव, जन्मतारीख व जात बाबत खात्री करुन घ्यावी.

७) खालील नमूद केलेप्रमाणे आवश्यक तेवढीच कागदपत्रे पाठविण्यात यावी व त्यावर पान क्रमांक नमूद करण्यात यावा. अनावश्यक कागदपत्रे पाठवू नयेत

**इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे जातीत बदल करणेबाबत.**

१. शाळेचे/महाविद्यालयाचे शिफारस पत्र - सदर पत्रात विद्यार्थी कोणत्या इयत्तेत शिकत आहे याचा स्पष्ट उल्लेख असावा.

२. नमुना क्र. ३ (जातीत बदल) या प्रपत्रातील सर्व मुद्दे भरणे आवश्यक आहे तसेच प्रपत्रावर प्राचार्य यांची स्वाक्षरी व शिक्का असावा, व सदर विद्यार्थी कोणत्या इयत्तेत शिकत आहे याचे उल्लेख असावा.

३. पालकांचे प्रतिज्ञापत्र

**४. विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने साक्षांकित केलेली प्रत**

५. विद्यार्थ्यांच्या इ. १० वी चा शाळा सोडल्याचा दाखला.

६. विद्यार्थ्यांचे बोनाफाईड सर्टिफिकेट.

७. विद्यार्थ्यांचे नावाची जनरल रजिस्टरची प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने साक्षांकित केलेली प्रत.

**इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे नावात/आडनांवात/वडिलांच्या नावात बदल करणेबाबत.**

१. शाळेचे/महाविद्यालयाचे शिफारस पत्र - सदर पत्रात विद्यार्थी कोणत्या इयत्तेत शिकत आहे याचा स्पष्ट उल्लेख असावा.

२. नमुना क्र. २ (नावात/आडनांवात/वडिलांच्या नावात बदल) या प्रपत्रातील सर्व मुद्दे भरणे आवश्यक आहे तसेच प्रपत्रावर प्राचार्य यांची स्वाक्षरी व शिक्का असावा, व सदर विद्यार्थी कोणत्या इयत्तेत शिकत आहे याचे उल्लेख असावा.

३. पालकांचे प्रतिज्ञापत्र

**४. विद्यार्थ्यांचे नावाचे महाराष्ट्र शासन राजपत्र- सदरचे नांव हाईलाईट करणे.**

५. विद्यार्थ्यांच्या इ. १० वी चा शाळा सोडल्याचा दाखला.

६. विद्यार्थ्यांचे बोनाफाईड सर्टिफिकेट.

७. विद्यार्थ्यांचे नावाची जनरल रजिस्टरची प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने साक्षांकित केलेली प्रत.

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव
शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद पुणे/सोलापूर/अहमदनगर
सदरचे परिपत्रक आपले जिल्हयातील सर्व कनिष्ठ महाविद्यालय यांना निदर्शनास आणून देण्यात यावे.